माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : १७८०/२०२०

अपिलार्थी, श्री. अनिल केशवराव तिजारे,
मु. पो. पारडसिंगा, ता.काटोल जि. नागपूर

विरुध्द...

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, काटोल ता. काटोल जि. नागपूर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, काटोल ता. काटोल जि. नागपूर

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०७.२०२२

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

अपीलकर्ता	:	**उपस्थित**
जन माहिती अधिकारी	:	**उपस्थित**
प्रथम अपीलीय अधिकारी	:	**उपस्थित**

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
११.०५.२०२०	०१.०६.२०२०	२२.०७.२०२०	०३.०९.२०२०

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा नायब तहसिलदार,** तहसिल कार्यालय, काटोल ता. काटोल जि. नागपूर यांच्याकडे **दिनांक ११.०५.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " कृष्णा दाजीबा तिजारे यांचा मृत्यु दि. १६.०४.१९५८ च्या मृत्यु अन्वये १९६१ चे फेरफार नुसार" याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी **दिनांक** ०१.०६.२०२० ला अर्जात नमुद मागणी केलेली माहिती आपल्या

विभागाशी संबंधित असल्यामुळे कलम ६(३) अन्वये अर्ज आपल्या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. या अर्जावर कलम ७(१) प्रमाणे उचित कार्यवाही करुन अर्जदारास परस्पर कळविणयत यावे व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, असे कळविले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक** २२.०७.२०२० रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी **तथा नों तहसिलदार,** तहसिल कार्यालय, काटोल ता. काटोल जि. नागपूर यांचेकडे "चुकीची व असमाधानकारक माहिती" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०३.०९.२०२० रोजी सुनावणी घेवून आदेशात अपील मान्य करण्यात येते, जन माहिती अधिकारी तथा ना.त. यांनी संबंधित प्रकरणात उपलब्ध असलेली संपूर्ण कागदपत्र १५ दिवसात शोध घेवून सदर माहिती अर्जदार यांना विनामुल्य पुरवावी तसेच कागदपत्र प्राप्त न झाल्यास त्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २८.१०.२०२०** रोजी "प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **१८.०७.२०२२** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री. अनिल तिजारे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र अवंजाळ ना. तहसिलदार काटोल उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी श्री. अजय चरडे तर्फे राजेंद्र अवंजाळ ना. तहसिलदार काटोल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी **दिनांक** ०१.०६.२०२० ला अर्जात नमुद मागणी केलेली माहिती आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे कलम ६(३) अन्वये अर्ज आपल्या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले. त्यावर दाखल प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशात अपील मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी संबंधित प्रकरणात उपलब्ध असलेली संपूर्ण कागदपत्रे १५ दिवसात शोध घेवून सदर माहिती अर्जदार यांना विनामुल्य पुरवावी तसेच कागदपत्र प्राप्त न झाल्यास त्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे, असे आदेश पारीत केले आहे. अपिलार्थी यांचे माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहिती संदर्भात श्री. श्रीकृष्ण दाजीबा तीजारे यांचा दिनांक १६.४.१९५८ रोजी मृत्यु झाला असुन त्यांच्या जमीनीची फेरफार पंजी उपलब्ध नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगीतले. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ नुसार उपलब्ध कार्यालयीन अभिलेखाचे

पुनश्च एकदा अपिलार्थीस अवलोकन देवून प्राप्त माहिती विनामुल्य पुरवावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १८.०७.२०२२

जावक क्रमांक 38 दिनांक 6 JAN 2023